दाखल दिनांक : २१/०७/२०११
नोंदणी दिनांक : २१/०७/२०११
निकाल दिनांक : १२/०७/२०१३
कालावधी : वर्ष महिना दिवस
०१ ११ २१

## माननीय सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, दौंड, जि.पुणे यांचे न्यायालयात

{ पिठासन अधिकारी : ग. रु. तौर }

नियमित दिवाणी दावा कमांक : १८४/२०११
निशाणी कमांक : १९

श्री. शहाजी गुलाब शिंदे )
वय– १२ वर्षे धंदा – शिक्षण, )
वादी अज्ञान त्याची अ.पा.क. जनाक आई )
सौ. हौसाबाई गुलाब शिंदे )
वय – ३२ वर्षे, धंदा – घरकाम )
दोघेही राहणार – वांगदरी, )
ता.– श्रीगोंदा, जि.– अहमदनगर ) .......... **वादी**

**विरुध्द**

श्री. गुलाब नारायण शिंदे )
वय – ४० वर्षे, धंदा – शेती, )
राहणार – मु. पो. गिरीम )
ता.–दौंड, जि.–पुणे. ) ......... **प्रतिवादी**

---

**दावा वाटपाकरीता व निरंतर मनाई मिळणेबाबत...**

---

**उपस्थिती :–**

श्री सी. डी. सोनवणे विधीज्ञ वादीतर्फे
प्रतिवादी करीता एकतर्फा

---

# न्या य नि र्ण य

{ घोषित दिनांक १२ जूलै, २०१३ }

१) वादीचे वादपत्रातील संक्षिप्त कथन असे आहे की, प्रस्तुत दाव्याचा विषय हा तुकडी पुणे, पोट तुकडी ता.दौंड, मे. दुय्यम निबंधक साो. दौंड, तसेच जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती दौंड यांचे हद्दीतील गांव मौजे गिरीम, ता.—दौंड, जि.—पुणे येथील शेतजमीनी मिळकती असून त्याबाबतचे वर्णन खाली नमुद केल्याप्रमाणे :—

अ) गट नंबर ४६२/१ यासी क्षेत्र ०७ हेक्टर ३३ आर अधिक पोटखराब ०० हेक्टर ३८ आर एकुण ०७ हेक्टर ७१ आर क्षेत्र यासी चर्तु:सिमा

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | — | गट नंबर ४६३ |
| पश्चिमेस | — | गट नंबर ४६०/४६२ |
| उत्तरेस | — | गट नंबर ४६३ व कॅनॉल |
| दक्षिणेस | — | गट नंबर ४७१ |

यापैकी वादी व प्रतिवादी यांचे हिश्याचे प्रतिवादी यांचे नांवे असलेले क्षेत्र ०० हेक्टर ६४ आर + पोट खराब ०० हेक्टर ०९ आर एकूण क्षेत्र ०० हेक्टर ७३ आर यांसी आकार ०० रु. ६९ पैसे

गट नंबर ४२३/१ यासी क्षेत्र ०१ हेक्टर २० आर यासी चर्तु:सिमा

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | — | गट नंबर ४२२, ४१५ |
| पश्चिमेस | — | ओढा |
| उत्तरेस | — | गट नंबर ४२४ |
| दक्षिणेस | — | गट नंबर ४१४, ४१३, ४१२ |

यापैकी वादी व प्रतिवादी यांचे हिश्याचे प्रतिवादी यांचे नांवे असलेले क्षेत्र ०० हेक्टर ४० आर यांसी आकार ०० रु. ८० पैसे

उपरोक्त नमूद दावा मिळकतीस यापुढे संक्षिप्तरित्या ''दावा मिळकती'' असे संबोधण्यात येते.

३) वादीचे संक्षिप्त अभिकथन असे की, दाव्यातील प्रतिवादी हे वादीचे पिता असून वादीचे आईचे पती आहेत. त्यांचा विवाह दिनांक १३/०४/१९९६ रोजी झाला असून सदर लग्नसंबंधातुन वादी हा मुलगा झालेला आहे. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दावा मिळकतींचे अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. दावा मिळकती हया प्रतिवादीचे वडील नारायण यांच्या मृत्युनंतर वारसा हक्काने प्रतिवादीचे नांवे फेरफार नं. २८२४ ने ७/१२ ला वारसाहक्काने झाली आहे. वादीचा प्रतिवादीने मानसिक व शारिरीक छळ करुन दोन वर्षापुर्वी घरातून हाकलून दिल्यापासून ते आजपर्यंत वादींचे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण दवाखाना याची कोणतीही सोय केली नाही तसेच सदर दावा मिळकतींचे त्यांच्यात व प्रतिवादीमध्ये अद्याप वाटप झालेले नाही. प्रतिवादी हा दावा मिळकतीतील वादींचा हिस्सा बुडविण्याच्या दृष्ट हेतूने व वादींना त्यांचा हक्क मिळू नये म्हणून दावा मिळकतीची विक्री, तबदिली करण्याचे विचारात असून सदरची मिळकत प्रतिवादी ति—हाईतांस विक्री केल्यास वादींचे हक्कावर गदा येईल म्हणून वादी यांनी प्रतिवादी यास पंधरा दिवसापुर्वी दावा मिळकत विकू नका, आमचा हिस्सा आम्हांला द्या म्हणून मागणी केली असता वादीने त्यास मी तुम्हाला जमीन मिळू देणार नाही, मी ती विकून टाकणार आहे.'' असे म्हणाले. त्यामूळे वादींना दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा एकत्रात ठेवावयाचा नाही, त्यांना त्यांचा दावा मिळकतीतील हिस्सा सरसनिरसमानाने वाटप करुन मिळावा म्हणून वादीने प्रस्तुतचा दावा निरंतरची ताकीद मिळणेकामी दाखल केलेला आहे. तसेच दावा मिळकतींचे वादींना त्यांचा हिस्सा सरसनिरसमानाने वाटप होवून मिळेपर्यंत प्रतिवादीने दावा मिळकतीची विक्री, तबदीली लावू नये अगर त्यावर कर्ज बोजा निर्माण करु नये व वादींचा सदर मिळकतींमध्ये असलेला अविभक्त १/२ हिस्सा सरसनिरसमानाने वाटप व पृथ्थक करुन वादीच्या प्रत्यक्ष ताब्यात मिळावा अशी विनंती केलेली आहे. शेवटी वादीने त्याचे विनंतीनुसार दावा मंजूर करण्याची विनंती केली.

४) प्रतिवादीस प्रस्तुत दाव्याच्या समन्सची बजावणी निशाणी क्रं. १० प्रमाणे होवून देखिल ते हजर राहत नसल्याने या न्यायालयाने दिनांक ०५/१०/२०११ रोजी निशाणी क्रमांक १ खाली आदेश पारीत करुन प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द एकतर्फा चालविण्याबाबत आदेश पारीत केला.

५) अभिलेखावरील उपलब्ध साक्षीपुरावा व वादींच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर माझे समोर न्यायनिवाडयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत असुन त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणासहीत खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दावा मिळकती हया प्रतिवादीच्या मालकीवहीवाटीच्या असल्याचे वादी सिध्द करतो का ? | ................ होकारार्थी |
| २) | दावा मिळकतींमध्ये वादीचा एक दृतीयांश अविभक्त हिस्सा असल्याचे वादी सिध्द करतो का ? | ................ होकारार्थी |
| ३) | वादीस त्याचे मागणीप्रमाणे निरंतरची ताकीद मिळण्याचा हक्क प्राप्त होतो का ? | ................ होकारार्थी |
| ४) | आदेश व हुकूमानामा काय ? | ...... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणेमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ४ बाबत :—**

६) प्रस्तुतचे मुद्दे परस्परांशी निगडीत असल्याने व त्याकरीता लागणा—या पुराव्याचा स्त्रोत एकच असल्याने मी सदर मुद्दे एकत्रित चर्चित आहे. वादी यांनी स्वत:करीता व त्यांचेतर्फे वादी क्रमांक १ हिचे स्वत:चे सरतपासणीचे शपथपत्र दाखल केले आहे जे निशाणी क्रमांक १५ वर आहे. तसेच वादींतर्फे निशाणी क्रमांक ३ सोबत कागदोपत्री पुरावा दावा मिळकत गट नंबर ४६२/१ चा सात बाराचा उतारा दाखल केला आहे जो निशाणी क्रमांक १६ वर आहे. तसेच दावा मिळकत गट नंबर ४२३/१ चा सात बाराचा उतारा दाखल केला आहे जो निशाणी क्रमांक १७ वर आहे.

७) निर्विवाद वादींच्या दाव्यास प्रतिवादी यांनी आव्हान दिलेले नाही किंबहुना वादींच्या दाव्याचे प्रतिवादी यांचेतर्फे खंडन करण्यात आलेले नाही किंबहुना वादींनी प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल केलेल्या साक्षीपुराव्याचे प्रतिवादी यांचेतर्फे खंडन करण्यात आलेले नाही. भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम ११४ अन्वये वादींनी दाखल केलेला साक्षीपुरावा विधीग्राहय असल्याने तो आहे तसा स्विकारणे न्यायोचित आहे.

८) वादींनी दाखल केलेल्या सरतपासणीचे शपथपत्राचे अवलोकन केले असता ते दाव्याची हुबेहुब नक्कल असल्याचे स्पष्ट होते. न्यायनिर्णयाची लांबण टाळण्याचे दृष्टीने मी त्याची विस्तृत विवेचन करण्याचे टाळलेले आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी यांचे नाव असल्याबाबत वादीतर्फे दाखल करण्यात आलेला कागदोपत्री पुरावा निशाणी क्रमांक १६ व १७ हे दावा मिळकतींचे सात बाराचे उतारे असुन त्याचे अवलोकन केले असता दावा मिळकतीत सुध्दा त्यांचे नांव मालक सदरी असल्याचे दिसुन येते.

९) एकंदरीत वादींतर्फे दाखल करण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री साक्षीपुराव्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारे आव्हान दिले नाही, त्यामूळे वादीचे शपथपत्रामधील मजकूर विनाआव्हानीत राहिला.

१०) उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने माझे असे स्पष्ट मत आहे की, वादीने दावा मिळकती हया प्रतिवादीच्या वडीलोपार्जित मालकीच्या असून त्यांचेत अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नसुन दावा मिळकतींमध्ये वादींचा एक दृतियांश अविभक्त हिस्सा असल्याचे वादीने सक्षम व परिपोषक साक्षीपुराव्यानिशी सिध्द केलेले आहे. सबब वादी हे त्यांचे मागणीप्रमाणे प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतरची ताकीद मिळण्यास पात्र आहेत असे माझे स्पष्ट मत आहे. वादींनी त्यांची मागणी सक्षमरितीने शाबीत केलेली असल्याने वादीचा दावा खर्चासह मंजुर करणे न्यायोचित आहे. परिणामी मी मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक ४ चा निष्कर्ष नोदवण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ वादींचा दावा खर्चासहित मंजूर करण्यात आला.

२ दावा मिळकतींमध्ये वादी यांचा एक व्दितीआंश (१/२) अविभक्त हिस्सा आहे असे जाहीर करण्यात येते.

३. दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप होईपर्यन्त प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारे स्वत: मुखत्यारामार्फत तसेच नोकरचाकर, एजंट व अन्य कोणीही दावा मिळकतींमध्ये कोणत्याही प्रकारची तबदील, विक्री, विल्हेवाट करु नये

अगर सदर दावा मिळकतीवर कोणाचेही हक्क निर्माण करु नये अगर बोजा निर्माण करु नये अशी निरंतरची मनाई देण्यात येते.

४. दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ अन्वये मा. जिल्हाधिकारी, पुणे अथवा त्यांनी नेमलेल्या राजपत्रित अधिकारी यांचेमार्फत करण्याचे आहे.

५ याप्रमाणे प्रारंभिक हुकूमनामा करण्यात यावा.

(प्रस्तुतचा निकाल खुल्या न्यायालयात देण्यात आला.)

सही/—

दिनांक : १२/०७/२०१३

**(ग. रु. तौर)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्त. दौंड

# **शेरा**

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ. न्यायनिर्णय फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव (निम्न श्रेणी) | :— | ताजोद्दीन अ. बशीर सय्यद |
| कोर्टाचे नांव | :— | (गणेश रू. तौर)<br>सह.दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>दौंड. |
| दिनांक | :— | १२/०७/२०१३ |
| पिठासीन अधिका—याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :— | १२/०७/२०१३ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :— | १२/०८/२०१३ |